**महत्वाचे परिपत्रक**

जा.क्र.सीपीएस/रा.कीना.दर/२०१३-१४/६६ /गुनि-५/२०१३
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे — ४११ ००१
दिनांक- १३ मे २०१३

**प्रति,**

**१. विभागीय कृषि सहसंचालक ---------------------------- (सर्व)**
**२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ----------------- (सर्व)**
**३. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ------------------------- (सर्व)**
**४. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद ------------------ (सर्व)**

**विषय: सन २०१३-१४ करीता विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अनुदानावर पुरवठा करण्यायासाठी रासायनीक कीडनाशकांचे दराबाबत...**

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्रं पीकरक्षा १०७९/६६११४/सीआर-६२६/५ए, दि. ९ मे १९८०
२) शासन निर्णय क्रं सीपीएस/१२८३/३७३८६/सीआर१२५/५ए, दि. १६/८/१९८३
३) शासन निर्णय क्रं सीपीएस/१०९२/४१४१/केंनं २१५/७ए, दि. १७ जुलै १९९३ ४) आयुक्तालयस्तरावरील दर निश्चिती समितीची सभा दि. ०४/५/२०१३

**पार्श्वभूमी :**

राज्यात विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत राबविण्यात येणा-या पीक संरक्षण मोहिमांसाठी अनुदानावर पुरविण्यात येणा-या पीक संरक्षण औषधांच्या पुरवठ्यासाठी शासनाने महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ यांची शासनमान्य पुरवठा संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. शासन निर्णय क्रं.सीपीएस/१०९२/४१४१/कें.नं.२१५/७-ए, दि. १७ जुलै १९९३ नुसार जी कीडनाशके महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ स्वत: उत्पादीत करते त्यांचा योजनांतर्गत पुरवठा त्यांचेकडून करण्याचे शासनाचे धोरण आहे.

**१. सन २०१३-१४ साठी कीडनाशकांचे दर :**

सन २०१३-१४ मध्ये राज्यात विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत राबविण्यात येणा-या पीक संरक्षण मोहिमांसाठी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांचेमार्फत पुरविण्यात येणा-या पीक संरक्षण औषधांचे पॅकींग साईजनिहाय दर सोबत सहपत्रित केले आहेत. सदर दर हे औषधांचा तालुकास्तरापर्यंत पुरवठा करण्यासाठीचे आहेत. शासकीय योजनांखालील पुरवठ्याचे दर खुल्या बाजारातील त्याच दर्जाच्या औषधांच्या दरापेक्षा जास्त राहणार नाहीत याची खात्री करण्याच्या दृष्टीने खुल्या बाजारातील दरांची चौकशी करावी. आवश्यकतेनुरुप सर्व तपशीलासह त्याबाबतचा अहवाल आयुक्तालयास पाठवावा, जेणेकरुन पुढील निर्णय घेणे सुलभ होईल. औषधांच्या तांत्रिक नावाने दरपत्रकात दर दर्शविण्यात आले आहेत. जी औषधे आय.एस.आय. मार्क आहेत, त्यांचे समोर आयएसआय मार्क असे नमूद केले आहे. त्याबाबत आपणास पुरविण्यात आलेली औषधे आय.एस.आय. मार्कचीच आहेत, याची खात्री करुन घ्यावी. ज्या नॉन आय.एस.आय. दर्जाच्या औषधांचे पुरवठयास मान्यता दिली आहे, त्याबाबत दर्जाची हमी पुरवठा संस्थेची

राहील. मात्र, अशा औषधांच्या नमुन्यांची तपासणी आय.एस.आय. मानकांनुसारच करण्यात येईल याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

**१.१** सन २०१३-१४ करीता रासायनिक कीटकनाशकांचे दर निश्चित करण्यात आले असून ते या परीपत्रकासोबत सहपत्रीत करण्यात आले आहेत. सदर दर हे सन २०१३-१४ करिता लागू राहतील.

## २. <u>कीडनाशकांची मागणी नोंदविणे प्रक्रीया</u> :

सोबतच्या दर पत्रकात दर्शविलेल्या कीटकनाशके/बुरशीनाशके यांची मागणी व पुरवठ्याचे दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**२.१:** दर पत्रकातील **(अ) अ.क्र. १ ते १५** वरील कीटकनाशके/बुरशीनाशके यांचे उत्पादन महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळामार्फत करण्यात येत असल्याने संदर्भीय दि.१७ जुलै १९९३ च्या शासन निर्णयानुसार त्यांचा पुरवठा केवळ महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळामार्फत करण्यात येईल. त्यामुळे सदर कीटकनाशके/बुरशीनाशके यांची मागणी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडे नोंदवावी.

**२.२:** शासकीय योजनेतंर्गत औषधांचा पुरवठा हा तांत्रिक नावानेच करण्यात येत असल्याने *<u>विशिष्ट ब्रॅण्डच्या</u>* औषधे पुरवठयासाठी पुरवठा संस्थेकडे कोणत्याही परिस्थितीत आग्रह धरु नये.

**२.३:** विविध योजनांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपल्या जिल्हयासाठी मंजूर आर्थिक/भौतीक लक्षांकाप्रमाणे व कीड/रोगाच्या प्रादुर्भावाचे प्रमाणानुसार केंद्रीय कीटकनाशक मंडळाचे मंजूर लेबल क्लेम्स व पीक संरक्षण शिफारस पुस्तिकेत शिफारस केलेल्या मात्रेप्रमाणे संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी आपल्या जिल्ह्याची पीक संरक्षण औषधांची मागणी विभागीय कृषि सहसंचालक यांचेमार्फत संबंधीत पुरवठा संस्थांकडे नोंदवावी. त्यासोबत तालुकानिहाय औषध पुरवठयाचा सविस्तर तपशिल पुरवठा संस्थेच्या जिल्हा/विभागीय कार्यालयास कळवावा. जेणेकरुन नियोजनबद्ध व वक्तशीर पुरवठा करणे शक्य होईल. कोणत्याही परिस्थितीमध्ये मंजूर आर्थिक/भौतीक कार्यक्रमापेक्षा जास्त मागणी किंवा शिफारस न केलेल्या औषधांची मागणी पुरवठा संस्थाकडे नोंदविण्यात येऊ नये. अतिरिक्त मागणी नोंदवून साठा शिल्लक राहील्यास, त्यास संबधित मागणी नोंदविणा-या अधिका-यास जबाबदार धरले जाईल याची नोंद घ्यावी.

**२.४:** तणनाशके ही पिकासाठी अती संवेदनशील असल्याने त्यांचा वापर करताना लेबल क्लेमवर नमुद असलेल्या वापराबाबतच्या सुचनांप्रमाणे तणनाशकांचा वापर करण्याची दक्षता घेण्यात यावी. तणनाशकांचा वापर करताना स्प्रेपंपाची स्वच्छता व योग्य प्रकारच्या नोझलचा वापर करण्याच्या सुचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात जेणेकरुन पिकाचे नुकसान होणार नाही.

**२.५:** मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी जनहीत याचिका क्र. २१३/२०११ च्या अनुषंगाने दिनांक १३/५/२०११ रोजी दिलेल्या अंतरीम आदेशास अनुसरून केंद्र शासनाचे इंग्रजी पत्र क्र. १३०३३/६/२०१११ पीपीआय, दिनांक १४/५/२०११ अन्वये एन्डोसल्फान या कीटकनाशकाच्या उत्पादन, विक्री व वापरावर पुढील आदेश होईपर्यंत बंदी घातली आहे. त्यामुळे एन्डोसल्फानचे दर निश्चित केले

नाहीत, तरी पुढील आदेश होईपर्यंत एन्डोसल्फान या कीटकनाशकाची मागणी, पुरवठा व वापर करण्यात येवू नये. याबाबत आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.१७३/२०११, दिनांक २ जून २०११ नुसार सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे.

**३. <u>कीडनाशकांची गुणवत्ता तपासणी</u> :**

**३.१ :** रासायनिक कीटकनाशकांच्या **<u>पुरवठापूर्व गुणवत्ता तपासणीसाठी</u>** उत्पादनस्थळी/गोदामस्तरावर साठा उपलब्ध झाल्याबरोबर प्रत्येक बॅचचा संबधित जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षक यांचेमार्फत किमान एक तरी नमुना काढून तो संलग्न शासकीय कीटकनाशक चाचणी प्रयोगशाळेत प्राधान्याने तपासून घ्यावा. याकरिता जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षकास सुचना द्याव्यात व तसे पुरवठा संस्थेस कळवावे. **<u>विश्लेषणात नमुना प्रमाणीत घोषीत झाल्यासच साठा पुरवठ्यासाठी मुक्त करावा व पुरवठा करताना त्याचा विश्लेषण अहवाल सोबत द्यावा.</u>** कोणत्याही परिस्थितीत पुरवठापूर्व गुणवत्ता तपासणी न करता किंवा पुरवठा पूर्व गुणवत्ता तपासणीत अप्रमाणित घोषीत झालेल्या किटकनाशकांचा पुरवठा होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संपूर्णत: संबधीत पुरवठा संस्थेची राहील. राज्याबाहेरील उत्पादकांबाबत ही कार्यवाही साठवणूक स्थळी करणे बंधनकारक राहील. त्यासाठी पुरवठा संस्थांनी राज्याबाहेरील उत्पादकांच्या साठवणूक स्थळाची माहिती संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परीषद यांना द्यावी.

**३.२ :** प्रत्यक्षात तालुकास्तरावर पुरवठा झाल्यानंतर प्राप्त झालेल्या रासायनिक कीटकनाशकांच्या दर्जाबाबत खात्री करण्याचे दृष्टीने **<u>पुरवठा पश्चात गुणवत्ता तपासणीसाठी</u>** प्राप्त साठयातुन बॅचनिहाय रॅन्डम पध्दतीने किमान एक तरी नमुना तालुका कृषि अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर काढून संलग्न शासकीय कीटकनाशक चाचणी प्रयोगशाळेत प्राधान्याने तपासून घ्यावा. जेथून रॅन्डम पध्दतीने नमूना काढला, तेथील नमुना काढलेल्या बॅचच्या साठ्याची नमुना घेताना पंचनामा करुन नोंद करावी. या **नमुना स्लीपवर** व नमुन्याच्या कव्हरींगवर **"मोहिमांतर्गत नमुना"** असे स्पष्टपणे नमुद करावे. जेणेकरुन प्रयोगशाळेत प्राधान्याने तपासणी करणे सोईचे होईल. या प्रकरणी रासायनिक कीटकनाशकांचे बाबत तपासणी फी पुरवठा संस्थेने सुरवातीस द्यावी व नंतर संबंधित उत्पादक/पुरवठादारांच्या देयकातून त्यांचेस्तरावर वसूल करावी. पुरवठा झालेल्या निविष्ठा गुणवत्तापूर्ण असल्याची खात्री करावी. प्रयोगशाळेत विश्लेषणांतर्गत नमूना अप्रमाणित घोषित झाल्यास संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांनी त्याबाबत तात्काळ पुरवठा संस्थेस व सर्व संबधीतास लेखी कळवावे, अहवालाची प्रत सोबत द्यावी, तसेच अशा बॅचच्या कीडनाशकांचा पुरवठा होणार नाही हे पहावे. नमूना अप्रमाणित घोषित झालेल्या कीडनाशकांच्या संपूर्ण बॅचचे देयक अदा करण्यात येऊ नये, यदाकदाचीत देयक अदा केले असल्यास देय ठरणा-या रकमेतून सदर रक्कम वसूल करावी, ही जबाबदारी संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, उपविभागीय कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांची राहील, याची नोंद घ्यावी.

### ४. <u>देयकांची अदायगी</u> :

ज्या योजनेखालील औषधांची मागणी नोंदविली आहे, त्या योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार लाभधारकांची निवड करणे व अनुदान मर्यादा देय राहील. सन २००८-०९ पासून पीक संरक्षण मोहिमांतर्गत पुस्तकी समायोजनाची कार्यपध्दती बंद करण्यात आली आहे. याबाबत यापूर्वी कृषि संचालक (वि. व प्र.) यांच्याकडून सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे कीडनाशकांचे लाभार्थींना वाटप करताना लाभधारकांकडून अनुदान वजा जाता रोख वसूल करण्यात येणारी लोकवाट्याची रक्कम संबंधीतांनी १५ दिवसात जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे जमा करावी. **लोकवाट्याची रक्कम कोणत्याही परिस्थीतीत चलनाद्वारे शासकीय कोषागारात भरणा करण्यात येवू नये.** जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर रक्कम ३० दिवसात पुरवठा संस्थेस अदा करावी. सदर रक्कम वेळेवर भरणा न केल्यास शासकीय रकमेचा अपहार या सदराखाली संबंधितांविरुध्द तात्काळ कार्यवाही करावी. याबाबीचे संनियंत्रण करण्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील. योजनांतर्गत अनुदानाची रक्कम परस्पर पुरवठा संस्थेस वेळेवर अदा करावी. देयकांचे अदायगीस विनाकारण विलंब झाल्यास त्यास संबधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/कृषि विकास अधिकारी, यांना जबाबदार धरण्यात येईल.

**सहपत्र-** दरांचा तक्ता

स्वाक्षरीत /-
**कृषि संचालक (नि.व.गु.नि.)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**प्रत :-**

१) **मा. अप्पर मुख्य सचिव,** (कृषि व पणन) कृषि व पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, मत्सव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) **मा. आयुक्त कृषि,** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना माहितीस्तव सविनय सादर.

३) **मा. व्यवस्थापकीय संचालक,** महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, आरे मिल्क कॉलनी, दिनकरराव देसाई मार्ग, गोरेगाव (पूर्व) मुंबई -६५ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव सादर. आपणांस विनंती की, वेळोवेळी कळविण्यात येणा-या जिल्हानिहाय पुरवठा कार्यक्रमाप्रमाणे कीडनाशकांचा वक्तशीर पुरवठा गटपातळीपर्यंत करण्याची कृपया व्यवस्था करावी. आपणाकडून पुरविण्यात येणा-या कीडनाशकांच्या दर्जाबाबत खात्री करुनच पुरवठा करावा.

४) **मा. व्यवस्थापकीय संचालक,** महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, कनमूर हाऊ स, नरसीनाथा स्ट्रीट, मस्जीद बंदर, (प.) मुंबई - ९ यांना माहितीस्तव सादर.

५) **कृषि संचालक, (विस्तार व प्रशिक्षण)/कृषि संचालक (फलोत्पादन)** यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव समादराने. विविध योजनांतर्गत पुरवठा करावयाच्या रासायनिक किडनाशकांच्या अनुदानाच्या दरांची मर्यादा ठरविण्याची कार्यवाही कृपया आपल्यास्तरावरुन तात्काळ करावी.

**६) मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी,** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-५ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

**७) कृषि उपसंचालक-पीक** संरक्षण/गळितधान्य/कडधान्य/नगदी पीके/तृणधान्ये, नियोजन व फलोत्पादन
यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

स्वाक्षरीत /-
**कृषि संचालक (नि.व.गु.नि.)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**सन २०१३-१४ मध्ये विविध पीक संरक्षण मोहिमांतर्गत पुरविण्यात येणा-या कीडनाशकांचे पॅकीगनिहाय दर दर्शविणारा तक्ता**

| अ) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ स्वत: उत्पादीत कीडनाशके/बुरशीनाशके | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र** | **औषधाचे नाव** | **पॅकींग साईज** | **२०१३-१४ साठी ठरविण्यात आलेले दर प्रति युनिट (रुपये)** |
| **१** | **२** | **३** | **४** |
| **१** | **कार्बनडायझीम** ५० डब्लू. पी. (आयएसआय) | १०० ग्रॅम | **४७.००** |
| | | २५० ग्रॅम | **१०५.००** |
| | | ५०० ग्रॅम | **२००.००** |
| | | १ किलो | **३९०.००** |
| **२** | **मॅन्कोझेब** ७५ डब्लू.पी. (नॉन आयएसआय) | ५०० ग्रॅम | **१५७.००** |
| **३** | **मेटॅलॅक्झिल** एम -झंड ७२ डब्ल्यु. पी. (नॉन आयएसआय) | २५० ग्रॅम | **२२९.००** |
| | | ५०० ग्रॅम | **४२४.००** |
| **४** | **सी.ओ.सी.५०** टक्के डब्ल्यु. पी. (आयएसआय) | ५०० ग्रॅम | **२३०.००** |
| **५.** | **मोनोक्रोटोफॉस** ३६ टक्के इ.सी. (आयएसआय मार्क) | २५० मि.ली. | **१०८.००** |
| | | ५०० मि.ली. | **२०४.००** |
| | | १ लिटर | **३८९.००** |
| **६.** | **क्विनॉलफॉस** २५ टक्के इ.सी. (आयएसआय मार्क) | २५० मि.ली. | **९४.००** |
| | | ५०० मि.ली. | **१६५.००** |
| | | १ लिटर | **३१९.००** |
| **७.** | **क्लोरोपायरीफॉस** २० टक्के इ.सी. (आयएसआय मार्क) | २५० मि.ली. | **८०.००** |
| | | ५०० मि.ली. | **१२५.००** |
| | | १ लिटर | **२३५.००** |
| **८.** | **मॅलेथिऑन** ५० टक्के इ.सी. (आयएसआय मार्क) | ५०० मि.ली. | **१२९.००** |
| | | १ लिटर | **२५०.००** |

| **अ.क्र** | **औषधाचे नाव** | **पॅकींग साईज** | **२०१३-१४ साठी ठरविण्यात आलेले दर प्रति युनिट (रुपये)** |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| **९.** | **इमीडाक्लोप्रीड** १७.८ टक्के (नॉन | ५० मि.ली. | **६०.००** |
| | | १०० मि.ली. | **१०५.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| | आयएसआय) | २५० मि.ली. | **२५०.००** |
| | | ५०० मि.ली. | **४७०.००** |
| **१०.** | **सायपरमेथ्रीन** २५ टक्के इ.सी. (आयएसआय मार्क) | १०० मि.ली. | **५५.००** |
| | | २५० मि.ली. | **१००.००** |
| | | ५०० मि.ली. | **१९९.००** |
| | | १ लि. | **३८९.००** |
| **११.** | **डायमेथोएट** ३० टक्के इ.सी. (आयएसआय मार्क) | २५० मि.ली. | **८९.००** |
| | | ५०० मि.ली. | **१५३.००** |
| | | १ लि. | **२८५.००** |
| **१२.** | **ॲसिटॅमिप्रिड** २० टक्के एसपी ( नॉन आयएसआय) | ५० ग्रॅम | **६३.००** |
| | | १०० ग्रॅम | **११९.००** |
| | | २५० ग्रॅम | **२७३.००** |
| **१३.** | **अल्फामेथ्रीन** १० टक्के ई.सी. (नॉन आयएसआय) | २५० मि.ली. | **६४.००** |
| | | ५०० मि.ली. | **११७.००** |
| | | १ लि. | **२२९.००** |
| **१४.** | **हेक्झाकोनॅझोल** ५ टक्के एससी (नॉन आयएसआय) | ५०० मि.ली. | **१५०.००** |
| | | १ लि. | **२६७.००** |
| **१५.** | **इथिऑन** (नॉन आयएसआय) | ५०० मि.ली. | **१९०.००** |
| | | १ लि. | **३८५.००** |

स्वाक्षरीत /-

**कृषि संचालक (नि.व.गु.नि.)**

**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -१**